२०२२ सुरू --

अशी विधाने कवितेत आली तर ती सामान्य समजुतींवर आधारित असतात -- अचूक खानेसुमारीवर नव्हे. एक मारवाडी मला म्हणाला होता की खूप विद्वान होणे ही आमची आकांक्षाच नसते -- विद्वानांना विकत घेऊन नोकरीवर ठेवणे, ही असते. आता तो मारवाडी म्हणजे तुम्ही नव्हे. पण या समजुतींच्या पार ही कविता काही व्यक्त करते का, ते पाहावे -- तसे काही नसेल तर कवितेला बाद करावे. कवितेबाबतही मतमतांतरे असणार.मुळात इथे नैतिक-अनैतिक वा चांगले-वाईट असे कुणाला मूल्यात्मक काही ठरवण्याचा प्रश्नच नाहीय. कोणत्याही प्रकारची व्यग्रता दु:खच निर्माण करते आहे -- हा आहे विषय. आणि जे नैतिक म्हटले जातेय तेही ' स्वर्ग ' निर्माण करत नाहीय. ' नैतिक तयारी ' म्हणजे काय ? तशी कुणाची असेल तर ती वैचारिक म्हणून दांभिक असेल. ' समाजाच्या दोन पावले पुढे ' असणारे तौलनिक नैतिक अधिष्ठान निरर्थकच असणार -- मी तसले काही शोधत नाही.याहून जास्त आपण एकमेकांना काही पटवत नको बसायला -- सुसंगत वैचारिक नैतिकता हा तुमचा प्रांत असावा -- माझा नाही. त्यामुळे, संवादच अशक्य !

माझा जिगरी दोस्त ! विनोदसम्राट नट असतात तसा हा विनोदसम्राट दिग्दर्शक ! मराठी नाट्यसृष्टीत माझी प्राणप्रतिष्ठापना याने आणि विनायक पडवळने केली ! प्रकाशने बसवलेली माझी ' नातं ' ही एकांकिका ८५ स्पर्धकांत पहिली आली होती ! शिवाय त्याने, ' उत्सव ', ' दिनकर पुरोहितचा खून ', ' पोत्यातून गोत्यात ', ' संसाराणूपेंडघार ' या माझ्या संहिता रंगभूमीवर आणल्या ! प्रकाशला माझ्या खूप खूप शुभेच्छा ! ( प्रकाश बुद्धिसागर )

या निमित्ताने -- सुहास हा एक उत्तम नट ! त्याने विनायक पडवळने दिग्दर्शित केलेल्या माझ्या ' समुदाय ' या एकांकिकेत काम केले होते. ( सुहास पळशीकर ) .

जे जे तशा मन:स्थितीत असतात त्यांचा ! आणि आपण तर अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे भोक्तेच आहोत ना ! बरेच काही कंडेम करण्याची महामूर्ख सवय, हा आहे विषय. अशी सवय जातिविशिष्ट असते ?
या कवितेबद्दल चाललेय --

एक सूचना मांडून ठेवावी, असे वाटते -- राजकीय पुढाऱ्यांना थोडक्यात आवरायला सांगावे -- अध्यक्षांच्या भाषणाला पुरेसा वेळ द्यावा.

अगदी परफेक्ट आहे. नरसिंह रावांसारखा कुणी साहित्याबाबत बोलणारा असेल तर त्याचे भाषण जरूर व्हावे.

मुळात कवितेतला मी म्हणजे कवी स्वत: नसतो हे प्राथमिक सत्यच आपल्याला अनेकदा सांगावे लागते. एखादा वाचक कवितेला भ्रामक म्हणतो तेव्हा सत्य म्हणजे काय, हे त्याला विचारायचे नाही ? आणि उत्तरात परेलकर काय म्हणताहेत -- सत्याचे निश्चित काही सांगता येत नाही ! माझ्या कवितेत वा कोणत्याही लेखनात कुणाला ' विचारसरणी ' सापडत असेल तर मी फक्त ' धन्य ' म्हणू शकतो ! ' संभ्रम उचंबळून येणे ' तुम्हाला आवडते, परेलकरांना नाही -- ते संभ्रमाला दोष समजतात. ' सृजनात्म मूड ', ' तात्कालिक मनोवस्था ' यांचे तुम्ही स्तोम का माजवत आहात ? सृजनात्मक मूड हा तद्दन निरर्थक विचार का प्रसृत करत आहात ? व्यक्तिगत नसणे म्हणजे वैचारिक असणे हे प्रमेय मनात धरून तुम्ही कविता वाचत असाल तर खेदाची बाब आहे. मी असल्या वैचारिक मतांना कधीच महत्त्व न देता माझी कलाभिव्यक्ती करत आलेलो आहे, हे विदित व्हावे. ' अनुभव आणि माहिती

मेंदूची त्रस्तता कमी नाही करत ' या ओळी तुम्ही कोणत्या वैचारिकतेतून वाचल्या हे समजले नाही. माझे असे निरीक्षण आहे की तुमची जी कुठली असेल विचारसरणी ती डिस्टर्ब करणारे कुठे काही असू नये, असे तुम्हाला वाटत असावे. पण आपण तर अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे जानेमाने भोक्ते आहोत ! तरीही, कवितांना अप्रस्तुत फाटे फोडू नयेत, ही विनंती करून ठेवतो.
ठीक -- या एकूणातून पुन्हा आपापल्या आकलनाच्या मार्गांनी जाऊ -- कविता ही काही निष्कर्ष काढण्याची प्रक्रिया नव्हे -- धन्यवाद !
**१२ जानेवारी २०२२.**

तुम्ही, मी, शंकर वैद्य, पु. शि. रेगे, पु. ल. देशपांडे आणि मर्ढेकर अशा महान लोकांचा कॉमन धागा ( इस्माईल युसुफ कॉलेज ) ! आपणच काय आपल्याला शुभेच्छा द्यायच्या -- तरीही – ( मनीषा कुलकर्णी ).

' शब्दरत्नाकर ' मध्ये किंकाळणे आणि किंचाळणे ही दोन्ही क्रियापदे दिलेली आहेत. तरीही, किंकाळी आहे पण किंचाळी नाहीय. माझ्या एका नाटकाला हे नाव देताना मला क पेक्षा च अधिक त्रासदायक -- कर्कश वाटला होता.

Vidyasagar Adhyapak, Anand Alkunte, Madhurani Gokhle, Prashant TapasvI, Ganesh Sagade.
सध्या लोकांना माहीत असलेले घेतले, इतकेच, नाही तर आणखी खूपच आहेत -- विसरेन कसा ?

खरे मत ? ते माझ्याकडेही नाही आणि तुमच्याकडेही ! कलेच्या प्रक्रियेत मताची किंमत शून्य -- तेच तर मांडलेय !

कोणतीही मतमतांतरे वा कट्टरता अशी ना कलेची जबाबदारी असते ना तिचे कर्तव्य -- असे जगातले अनेक मोठे कलावंत, विचारवंत म्हणून गेलेले आहेत. -- असे म्हणणे हीच एक कट्टरता आहे, असा तर्क यावर सुरू होऊ शकेल ! त्यामुळे, याहून जास्त, तेच तेच बोलत न बसता, ज्याचे त्याने समजून घ्यावे, हे बरे.

आपल्याला माहीत असलेली तीच ही माशी असे समजून वाचले तर कवितेची माती होईल -- पण इलाज नाही – ही माशी असामान्य वगैरे काही नाहीय हो, तुमच्यामाझ्यातलीच आहे.
मला अस्वस्थ नाही करत, तुमच्या अप्रस्तुत शेऱ्यांमुळे काय होतेय ते फक्त निदर्शनास आणले. ' कवी आणि वाचक ' ही एक पोस्ट कालच दिली आहे -- तीत तुमच्या प्रश्नांची उत्तरे आहेत.

कवीच्या चिंतनात त्याला महत्त्वाचे वाटते ते येत असते -- वाचकाच्या अपेक्षेत ते बसत नसेल तर त्याने ती कविता वाचू नये. पण कवीने काय करायला हवे, वगैरे सांगत बसू नये. कविता वाचकाला ' खरी ' वाटण्याची चिंता कवीने मुळीच करू नये. रूटीन मनाला ' खोटंनाटं / भलतंसलतं / अतिशयोक्त ' वाटणारेच तर असते कलेत. ' ट्रायल ' कादंबरी कोणत्या रूटीन मनाच्या गावी असू शकते ? न-कविता, अतिवास्तववादी कविता ही,
फक्त परिवर्तनवादी अपेक्षा ठेवणाऱ्यांना भाषेने केलेली फसवणूकच वाटू शकते. हे पाहून कवीने तीच ती रटाळ री ओढत बसावी ? एखादी कविता निरर्थक, रद्दड म्हणून टाकून देण्याचे स्वातंत्र्य वाचकाला असतेच -- त्यात कवी ढवळाढवळ करूच नाही शकत. ' नेहमीच्या ' मनाचा ताबा सोडून मुक्तपणे कविता लिहिणे हे आता नवीन राहिलेले नाही. पण, हे मान्यच नसलेले वाचक असू शकतातच.
खरे आहे -- वाचकांचे अभिप्राय, आधी लिहून गेलेले लेखक-कवी, इतर कलांचे संपर्क या सर्वांतून लिहिणारा शिकत असतोच. मला तर वाटतेच की माझी कविता मी एकटाच नाही लिहीत -- अनेक लेखक-कलावंत मिळून लिहितो –

अर्धवट, सोयीस्कर, आपमतलबी आणि आक्रमक संवेदनशीलता -- हा आहे शाप !

' सोवळी ' हा शब्दच कंडेम करणारा आहे. अशा दृष्टीचा उल्लेख केलेला आहेच. माझ्या लेखनाला काही मारक ठरते असे मला दिसत असेल तर या माझ्या वॉलपुरते बोलायचा मला हक्क आहे. इथे अप्रस्तुत कीचड चर्चा नसावी म्हणून ही पोस्ट दिलेली आहे. आपापल्या वॉलवर वाटल्यास या लेखनाबद्दल फक्त राजकीय लिहीत बसावेसे कुणाला वाटले तर माझी हरकत कशी असेल ?अहो, ते पूर्ण स्वातंत्र्य आहेच ना वाचकाला ! हे लेखन कसे राजकीय आहे वा प्रतिगामीपणाचे आहे वा मानवी समाजाला हानिकारक आहे ते लिहू-बोलू द्या ना कुणालाही -- मी कसा अडवणार ? इथे काही गंभीरपणे, खुलेपणाने वाचणारे वाचक आहेत त्यांना विक्षेप नका आणू, एवढाच आहे मुद्दा. माझ्याच वॉलवर माझ्या कवितेची मोडतोड, नासधूस करण्याचे स्वातंत्र्य मी कुणाला का द्यावे ? आणि मी आग्रही नाही याचा अर्थ हे असले चालवून घ्यावे, असे मुळीच नाही. आता हे माझे म्हणणे चुकीचे आहे असे कुणी म्हणू शकेल पण ते माझ्या स्वातंत्र्यात आणि हक्कात बसणारे आहे. याहून जास्त काय बोलणार ?
अहो, हे अनेकदा स्पष्ट करावे लागते, इतके वातावरण प्रदूषित आहे !
असे होऊ शकेलच -- उदाहरणार्थ अनियंत्रित किंवा अतिवास्तववादी कवितेला बौद्धिक संगती नाही लागत -- ती असायलाच हवी, असा आग्रह तिथे कामाचा नसतो.
**०५-०२-२२.**

टॅग लाईन :
विचारांचे डोळे
आकलन बोधप्रद करून टाकतात.
-- कवितेने इथे जाऊन पोचणे जबरदस्त ! ( रवी लाखे ).

अवकाश कलामंच, पुणे -- झिंदाबाद ! ( सुनील चौधरी ).

महत्त्वाचे मुद्दे मांडणारा लेख – ( गिरीश पतके ).

' घडून गेलेले ' विशेष काम ! ( शरद तरडे यांचे चित्र ).

वा, अति सुंदर ! ( प्रज्ञा दया पवार आणि लता मंगेशकर – फोटो ).
**०७-०२-२२.**

हिंदुत्ववादी कला, पुरोगामी कला, मध्यमवर्गीय कला, ग्रामीण कला, शहरी कला अशी विभागणी करत कला ' आस्वादणारे ' वेडे म्हणजेच एकूणच कलेचे कर्दनकाळ दिसू लागतात तेव्हा कवितेतून ते असे व्यक्त होते. हा उपरोध दुर्लक्षून ही कविता वाचण्याचा काही उपयोग नाही. या कवितेपासूनच तुम्ही आधी मुक्ती मिळवावी, हे बरे !

कला म्हणजे कलावंताच्या स्वभावातून -- त्याच्या मानसिक ठेवणीतून उगवणारी संकुचित रोपटी, असे ज्या ज्या भूमिकावाल्यांना वाटते त्यांना माझ्या कवितेतला आणि तुमच्या कोमेंटमधला उपरोध लागू आहे !
' ओलांडणे ' महत्त्वाचे -- हे मान्य !

त्याचे गुणगुणणे हे भूल देणे असते ! ( डासाचे )

बारावी झालेला आहे --
चि. आदित्यचा फोटो –

मनाचा साचलेपणा -- भूतकाळ -- हाच घटनांचा पाया –

( अशोक ) शहाण्यांवर लेख लिहिण्यासाठी ( शशिकांत ) सावंतांसारखा जाणकारच हवा !

सखोल आणि टाळक्यावर दणका देणारे सत्य ! ( स्वप्नील चव्हाणची कविता ).

बाप रे ! पुन्हा एकदा वाचले ! भाषा नाहीय ही नुसती -- ही तर सजग भानाची बिनधास्त ताकद आहे ! उत्तम गद्य कविता ! ( मेघा देशपांडे यांची कविता ).

सुंदर ! आजच्या दिवसाची सुरुवातच या अप्रतिम लेखाच्या वाचनाने झाली ! ( लीना पांढरे यांचा लेख ).

बाप रे ! अशी गहन चिंतनशील मुलाखत क्वचितच ऐकायला मिळते ! ( किशोरी आमोणकर ).

मूर्छावाद हा मी काही ऐकलेला नाही पण मराठीत तो अप्रत्यक्षपणे लोकप्रिय आहे, असे फार तर म्हणता येईल. 😊 आणि मूर्षावाद म्हणजे absurdity. ती जगभर माहीत आहे.

सीडॅक ने केलेल्या मराठी युनिकोडमध्ये हे अक्षर तर होतेच पण शिवाय प्रत्येक अक्षराची बटणे ठरलेली होती. इथे मात्र निवड करावी लागते किंवा लिहून झाल्यावर दुरुस्त्या करत बसावे लागते. एकदा जमलेले काम या गुगलवाल्यांना का जमवता नाही येत, हे एक गूढच आहे. त्यांना पैसे कमी पडत असले तर आपण वर्गणी काढू पण हे काम व्हायलाच हवे आहे.

शिवीच्या आगेमागे जी मोकळी स्पेस असते तीही शिवीच असते -- याहून अधिक ज्ञान हवे असेल तर ते फक्त आत्मचिंतनातूनच मिळू शकेल –

समस्या निर्माण करणे हेच मनाचे ' असणे ' आहे -- इकडे लक्षच न देणे –

मनाचे संबंध अर्धवट, आपमतलबी, संघर्षमय आणि विदीर्ण का, याकडे पाहावे –

यशपूजकता आणि आळशीपणा यांतला जो संबंध इथे दाखवलेला आहे तो अर्थपूर्ण आहे ! ( सतीश तांबे ).

म्हणजे, संधीतली समता नाकारली जावी, असा अर्थ होतोय या पोस्टचा ? धन्य ! तुम्हाला ही पोस्ट कळलेली नाही, हे माझे मत सांगून तुमच्याशी चर्चा संपवतो. धन्यवाद !
ठीक आहे -- आता तुमचे आणि माझे वाचून आपले मित्र काय समजून घ्यायचे ते पाहतील –
०८-०३-२०२२.

शाब्दिक व्यंगचित्रे काढतोय ! त्या लाईट पद्धतीनेच वाचले जावे -- पण, कुणाच्याही बाजूने भूमिका घेणाऱ्यांना वेगळे वाटू शकते याची जाणीव आहे !
कोणतीही मानसिकता अर्धवट आणि हिंसकच असते -- म्हणून तर मला जिथेतिथे अबसर्डिटीचे दर्शन होत असते !
माझ्या कोणत्याही मित्रांच्या मतांना मी बांधील नाही -- मला दिसणारी अबसर्डिटी व्यक्त करायचे मला स्वातंत्र्य असावे, ही विनंती. भावनिकपणे इकडे वा तिकडे गुंतण्यात मला अबसर्डिटी दिसते, त्याला काय करणार ?

हे एक वेळ तथाकथित धार्मिकांच्या डोक्यात शिरेल, पण, पुरोगाम्यांना कळणे अवघड दिसते.
( श्रीधर तिळवे यांच्या पोस्टवरची कॉमेंट ).

सध्या भारतात -- रॉयल म्हणजे एक पार्टी आहे फक्त !
१४-०३-२२.

या चित्रपटाच्या विषयाबद्दलच मतभेद आणि गोंधळ असणे, हा एक मुद्दा, प्रत्यक्षात चित्रपट पाहताना काय घडते आहे, हा दूसरा मुद्दा आणि मग या समस्येचे आकलन वा तिच्यापासून मुक्ती म्हणजे काय, हा तिसरा मुद्दा -- या मार्गाने ' सगळे ' पाहिले आहे. कदाचित काही व्यक्तिगत मतांची आग्रही अपेक्षा ठेवल्यामुळे तर हे गोंधळाचे वाटत नसेल ?
तुम्ही, प्लीज, या चित्रपटावर तुम्हाला ' योग्य ' वाटते, असे काही लिहा ना –
मी कुणाला विचारून एखादा चित्रपट बघत नाही -- कृपया राग मानू नये –
हे काय आहे ते मला माहीत नाही –
एका बाजूने लिहिणे, आगीत तेल ओतणे म्हणजे ' योग्य ' असे माझे आकलन नाही –
स्पष्ट आकलन शेवटच्या उताऱ्यात आहे, पण, ते तुम्हाला नको असावे !
तुमची मर्जी ! मानवहिताचे ' योग्य ' असे तुम्हाला जे वाटते ते कृपया लिहावे.
धन्यवाद, मित्रवर्य !
माझा कुणाशी लढा वगैरे नाही --
मी तर याच जगात राहतो --सुदैवी कसा मी ?
म्हणजे ढोंगीपणा करत आपमतलब साधून घेणे ! हे तर माझे मूल्यमापनच झाले ! विषयच संपला ! असे होणे कोणत्याही माणसाबद्दल शक्य असल्याने ही असली मूल्यमापन पद्धत अप्रस्तुत ठरते ! पण तुमची मर्जी !

विचार करा ना जरा -- दोन बाजू लढवल्या जात राहणे, हेच ध्रुवीकरण नाही का ?
मुळात तर्कशुद्ध भूमिका असे काही नसते -- प्रत्येक भूमिका अर्धवट आणि पूर्वग्रहाचीच असते. एक तर मूक प्रेक्षक बना नाही तर तेढ वाढवा या दोन्हींतूनच निवड करायची हे नक्की आहे तर चालू द्या. ' काय नेमके करायचे ' अशी निराकरणे तुमच्याकडे आहेत आणि इतर काही भूमिकावाल्यांकडे त्यांचीही निराकरणे आहेत. मग, आहे ते चालू ठेवा, दुसरे काय !
17-03-22.

चालेल ना -- मी नुसता सर्वधर्मसमभावी नाही -- असल्या धर्मांची गरजच नाही, असे मानणारा आहे !

या चित्रपटाच्या विषयाबद्दलच मतभेद आणि गोंधळ असणे, हा एक मुद्दा, प्रत्यक्षात चित्रपट पाहताना काय घडते आहे, हा दूसरा मुद्दा आणि मग या समस्येचे आकलन वा तिच्यापासून मुक्ती म्हणजे काय, हा तिसरा मुद्दा -- या मार्गाने ' सगळे ' पाहिले आहे. कदाचित काही व्यक्तिगत मतांची आग्रही अपेक्षा ठेवल्यामुळे तर हे गोंधळाचे वाटत नसेल ?
मानवी बुद्धी असल्या समस्यांवर कशी निकामी आहे, ते जर दिसत असेल तर ते का म्हणायचे नाही ? कुणी कशी मात करावी हा एक मार्ग झाला, पण, समस्येला आपले मन घडवते याचा निर्देश करणे महत्त्वाचे आहे. एक काही पक्के ठरवून बोंबलत युद्धे करत सर्वांच्या जगण्याचा विध्वंस करत राहणे हा जर शहाणपणा नसेल तर समस्येकडे पाहायलाच हवे. आपल्या आणि इतरांच्या मनांची चिरफाड करत जगणे, हेच ' नॉर्मल ' म्हणावे का, हा प्रश्न येतोच. हा प्रश्न कोणत्याही समाजाला नाही पडत, व्यक्तीला पडतो. व्यक्तीच्या प्रत्येक संबंधात ही समस्या उपस्थित असते.

कलेकडे वैचारिक निष्कर्षांशिवाय पाहता यावे –

स्वत:च्या ' घडलेल्या ' साच्यापासून स्वातंत्र्य -- हे सर्वच कलाप्रकारांतले कलावंत म्हणत असतात.या बाबतीत किशोरी आमोणकर यांच्या मुलाखती पाहाव्यात -- या प्रश्नांवर काही प्रकाश पडू शकेल. सगळे आहे ते योग्य आहे आणि हे असेच चालावे म्हटल्यावर प्रश्नच येत नाही. काही कलावंत याकडे असे पाहात नाहीत.मला काय वाटेल हे बाजूला ठेवू. माणूस काय वा जात, धर्म, देश काय, आत्मकेंद्रीच असणार, वर्चस्ववादीच असणार, सुखवादीच असणार, त्यातून न्याय-अन्याय घडतच राहणार, अन्याय झालेले चवताळणार, राजकारण म्हणून वेगवेगळे गट तयार होणार, मारामाऱ्या होणार, युद्धे होणार, विध्वंस होणार हे सगळे मान्य असल्यावर कलेची गरजच काय ? कुरघोडीचे, स्वार्थाचे जे जे चाललेले आहे त्याचाच एक भाग म्हणजे कला असेल तर आपल्या फायद्याच्या गटाची बाजू घेऊन निर्मिती करत राहावे ! पण, हा सगळा युद्धांचा नरक तयार करतानाही न्याय, समता, सौहार्द अशा मूल्यांच्याच गप्पा मारल्या जातात ! मग, मूल्य म्हणजे काय यावर थोडे बोल. की हे असेच चालावे, धडकेल तिथे धडकेल, नष्ट होईल तेव्हा नष्ट होईल, असेच सर्वांनी याकडे पाहावे, असे तुला वाटते ?मग प्रश्न काय आहे ? वेगवेगळी मते आहेत, गट आहेत आणि त्यांच्यांत विरोध आहेत आणि ते असणारच ! आणि कलेचे हे आणि हेच कामच आहे ! ते चालूच आहे ना !याचा अर्थ कलेत वा जगण्यात मूल्यात्मता वा सौहार्द असू शकत नाही -- कुणीही कुणालाही बरोबर-चूक म्हणण्यातही काही अर्थ नसतो -- माणसाचे जगणे नरकच असणार -- हे समजून जमेल तसे जगावे !

एका बाजूने लिहून आगीत तेल ओतणे म्हणजे ' योग्य ' असे माझे आकलन नाही.

मुळात तर्कशुद्ध भूमिका असे काही नसते. प्रत्येक भूमिका अर्धवट आणि पूर्वग्रहाचीच असते.

Philosophy of science नावाचे पुस्तक आहे, ते मिळवून वाच.

अनादी-अनंत हे बुद्धीत बसणारे नाही.

सार्त्र – नथिंगनेस, तुकाराम -- रिकामीक, जे कृष्णमूर्ती -- एमटीनेस, बुद्ध शून्य – हे बौद्धिक, तार्किक, वैचारिक आहे का ?

तिळव्यांच्या अनेक कविता मराठीत ' क्वचित ' असणाऱ्या कविता आहेत. नुसतेच मन काय म्हणतेय हे सांगत बसण्यापेक्षा मनाचीच छाननी करणाऱ्या या कविता आहेत.

अनुभव, विचार, शब्द, नेपथ्य, प्रकाश – ही सर्व माध्यमे आहेत. तर आशय म्हणजे काय, असे पाहायला हवे.

पण माणसांना मुखवटे नाही सोडता येणार !

गायतोंडे म्हणत की मी चित्र काढत असतो तेव्हाच फक्त चित्रकार असतो.

मी ऑथॉरिटी थोडाच आहे ? खोटे ते खोटे म्हणून पाहणे एवढेच – शोधायचे ज्याचे त्यानेच.

मूलयात्मकता जर माणसागणिक वेगवेगळी असेल तर तिला मूलयात्मकता म्हणताच येणार नाही.

तो सिसिफस का कोण होता ना, त्याला एक धोंडा डोंगरावर वाहून नेण्याची शिक्षा होती -- तो वर पोचत आला की तो धोंडा खाली यायचा गडगडत -- की पुन्हा सुरुवात ! ही मूर्षा ( absurditI ) दिसलेले लोक भूमिका कसली घेणार ?

अत्युत्तम आणि मराठी कवितेच्या दृष्टीने महत्त्वाची पोस्ट. नुसत्याच स्वत:च्या किरट्या, खुज्या भावभावना, अनुभव, प्रतिक्रिया, मते म्हणजे कविता नव्हे, हे या चिंतनातून व्यक्त होते आहे. ( रवी लाखे ).

कुसुमाग्रजांच्या अनेक कविता समोर घेऊनही मी इथे सविस्तर लिहिले होते -- ते तुझ्या पाहण्यात आले नसावे -- इथे जे ' विविध गुणदर्शन ' हे कारण दिले आहे ते मराठीतल्या अनेक कवींना लागू पडणारे आहे. पण चांगल्या कविता कोणत्या हेही नीट दाखवणारा ' मराठी कवितेवर ज्ञ किरण ' हा लेख लिहिणार आहेच.

समीक्षेत खूप वेळ घालवायची इच्छा नाही -- जमतेय थोडेफार म्हणून सगळे कुठे करत बसता !
26-05-22.

एकदा तर काय झाले कुणास ठाऊक, मला माझाच नंबर आठवे ना -- आता मी सेल्फ म्हणून तोही सेव्ह करून ठेवला आहे ! सारांश, शेवटून पाहिल्याच्या पुढची प्रगती मी एकदा केली होती !

Meena Naik सहा पात्रे -- माझ्याही लक्षात आहे ! दोनदा पाहिले होते !

Rahul Pungaliya म्हणजे यांचे काहीच नसणे वेगळे आणि त्यांचे वेगळे -- तुकारामाची रिकामीक वेगळी आणि सार्त्रचा नथिंगनेस वेगळा आणि जे. कृष्णमूर्तींचा एम्टिनेस वेगळा ! असे वेगवेगळे ' काहीच नसणे ' ?Rahul Pungaliya पूर्ण अमान्य -- सॉरी ! वेगवेगळे ' काहीच नसणे ' हे मुळात तर्कदुष्टच आहे. जेके लोकांना वैफल्यात ढकलण्यासाठी बोलत होते, हे अजब आहे. आणि हा एक ललित लेख आहे किंवा गद्य कविता -- हे काही सिद्ध करण्यासाठी वा पटवण्यासाठी नाही. वैचारिक स्तरावर या सगळ्याचीच निरर्थकता जाणवू शकते.

Milind Shintre आधी आपल्या भागातल्या मुलांना दूध वगैरे मिळाले पाहिजे म्हणून कृष्ण मथुरेच्या बाजाराला जाणाऱ्या गौळणींना अडवत होता हे सांगून त्याला पहिला कम्युनिस्ट म्हणण्यात आले होते -- म्हणणाऱ्याचे नाव आठवत नाही.

अत्यंत सुस्वभावी मित्र ! त्याने त्याच्या सुरुवातीच्या नाट्य प्रवासात माझा ' नातं ' हा दीर्घांक बसवला होता. त्याच्या स्मृतीस अभिवादन ! ( कुमार बडगुजार ).

सगळे बुद्धीच्या कक्षेत असते -- हे अमान्य ! ज्याला बुद्धी आणि विचार अंतिम वाटतात त्याला कोण अडवणार ? आगे बढते रहो –

जो भी है वो ठीक है
ज़िक्र क्यों करे
हम ही सब जहां
की फिक्र क्यों करे
-- हे गाणे म्हणत राहायचे मग -- दुसरे काय करणार ?

थोड्याफार प्रमाणात हे काम माझ्या लेखनातून अनेकदा केलेले आहे -- तुमच्या वाचनात ते आले नसावे -- माझे स्वत:चेच एखादे नाटक कसे ग्रेट आहे हे मात्र मी अजून तरी सांगितलेले नाही -- शक्य तो मी ते तसे करणे टाळेन –

Champra Deshpande
मकबूल फिदा हुसेन..
मी एका ठिकाणी दिलेला -- मला जाणवलेला -- त्या सरस्वतीच्या चित्राचा अर्थ --
मुळात हे देवीचे, स्त्री म्हणून काढलेले उत्तान, नग्न चित्र आहे, ही कल्पनाच चुकीची आहे. स्त्रीदेहाचे आकर्षण वा मादकता व्यक्त करणारे असे कोणतेही अवयव तसे रेखाटलेले नाहीत. तो स्त्रीदेह आहे असे सांगण्यापुरतीच रूपरेखा आहे. मुळात सरस्वती ही बुद्धी आणि सखोल ज्ञानाचे प्रतीक आहे. ते ज्ञान खुले, अनावृत आहे. सरस्वतीचा उजवा हात पाण्याबाहेर आल्याचे दाखवले आहे आणि त्या हातात कमळ आहे. हे ज्ञानाचे बाहेर आविष्कृत झालेले सौंदर्य आणि ताजेपण आहे. तो हात पाण्याबाहेर आलेला दाखवणे याचा अर्थच ती सरस्वती ज्ञानाच्या सखोल, वाहत्या प्रवाहात आहे. तिचे केस तिच्या डावीकडून उजवीकडे वाहते, लहरते दाखवलेले आहेत – तेही त्या प्रवाहाचे निदर्शक आहेत. ज्ञान हे स्थितिशील नसते – सतत वाहते, नवे, ताजे असते – हेच यातून सुचवलेले आहे. वरच्या बाजूला एक मासा दाखवलेला आहे. मासा जगतोच मुळी पाण्यातल्या प्राणवायूवर – तो ज्ञानाचा प्राणवायू आहे. माशाच्या त्या ज्ञानग्रहण प्रक्रियेचे निदर्शक असे बुडबुडे दाखवलेले आहेत. इथे वीणा तिच्या मांडीवर आहे. ती कला कौशल्य, नादसौंदर्य, संगीत यांचे प्रतीक आहे. त्या वीणेने सहजच योनीप्रदेश झाकला गेलेला आहे. ही लैंगिकतेला उत्तेजन न देणारी, उन्मादक नसलेली अशी कला आहे. मोर पिसारा फुलवून तिच्या मांडीवर नाचतो आहे. हे ज्ञानाचे फुलणे, आल्हादणे, व्यक्त होणे आहे. या सरस्वतीला व्यक्तिगत चेहरा नाहीय. ज्ञान व्यक्तिगततेच्या मर्यादा ओलांडणारे असते, हेच त्यातून सुचवलेले आहे. तिच्या कपाळावर आज्ञाचक्राच्या जागी कुंकवाचा टिळा आहे. बुद्धी आणि आध्यात्मिक ज्ञान यांचे ते केंद्र आहे. शिवाय ते स्त्रीच्या सौभाग्याचे लक्षण आहे. ती एक पत्नी आहे. पौराणिक संदर्भ धुंडाळून नक्कीच याचेही अधिक अर्थ लागतील. सरस्वती ही ब्रम्हाची पत्नी आहे. उत्पत्तीची, सर्जकतेची, निर्मितीची देवता आहे – हेही त्यातून व्यक्त होते. थोडक्यात, हे चित्र ज्ञानाची सर्जकता व्यक्त करते. मला यात आक्षेपार्ह तर काही वाटले नाहीच, उलट, या चित्रकाराने या देवतेचे सखोल प्रतिकात्मक अर्थ समजून घेऊन हे चित्र काढलेले आहे, असेच वाटले. यावर वाद झाले तेव्हा कुणी या चित्राचा हा अर्थ सांगितला होता की नाही, ते मला माहीत नाही. एकूणात, चुकीच्या पद्धतीने पाहून, चुकीचे अर्थ लावून, हुसेनांवर अन्याय झाला, असेच मला वाटते.
--- ००० ---

फोटोवरून तरी तू खूपच हुशार दिसतो आहेस ! 😀
Swapnil Chavhan
Champra Deshpande
थोडा अभिनय जमतो त्याचीच फलश्रुती 😀!

जेव्हा ओल असेल तेव्हा पावले जवळ जवळ टाकणे.

त्यांना खूप शुभेच्छा ! त्यांचे ' मराठी लेखन मार्गदर्शिका ' हे पुस्तक माझ्या कायम हाताशी असते !
( प्रा. यास्मिन शेख ).

बरेचजण स्वत:ची सुखदु:खे, रागलोभ आणि मते व्यक्त करण्यातच धन्यता मानतात !

प्रत्येकाला राजकारणाचं कुबड आलंय -- हे पर्फेक्ट आहे ! ( श्रीधर तिळवे यांची कविता ).

काहीजण म्हणताहेत, " मिटा डोळे, राहा झोपून !

तेच हे ! आता मराठीत विलीन झालेत !
इंद्रजित गेलाय ईडीच्या ऑफिसात !

बाप रे ! अतिभयानक समस्येवरचा जळजळीत लेख ! ( प्रा. लीना पांढरे यांचा अमेरिकेतल्या गर्भपातबंदी कायद्यावरचा लेख ).

गुवाहाटी इकडे खालीच आहे भारतात ! ( लाख्यांचा टोपी, गॉगल घालून वर पहात असलेला फोटो ).
२८-०६-२२.
०६-०७-२२.

' जणू काही वास्तव ' हे माझे नाटक बघायला ते आले होते ! स्मृतीस अभिवादन ! ( गंगाधर पाटील ).

बरेच लेखक हे पवित्रायुक्त लिहिणारेच असतात, बरेच समीक्षकही त्याच धारणेत असतात. त्यामुळे साहित्य वा कलाच काय, सगळे जगणेच राजकारण वा पवित्रे असा समज दिसतो. ते ' उपयुक्त ' पण खुजे आणि संकुचित साहित्य असते. पूर्ण माणसाला ते प्रस्तुत असू शकत नाही. जगातल्या अनेक कलावंतांनी हे नाकारलेले आहे. पण पवित्रा म्हणजेच जगणे किंवा जगणे म्हणजे पवित्राच असा ज्यांचा निष्कर्ष आहे तिथे सगळे थांबते. गटागटाचे गटागटासाठी असणारे साहित्य हे असल्या वर्चस्वाच्या इच्छेत असणारच, त्याला इलाज नाही. तसल्या लेखकांमुळे विषमता व हिंसा बोकाळणार, त्यालाही इलाज नाही.

मीही गाय छाप चा २० वर्षे भक्त होतो.

मला दोन वेळा नाट्यदर्पण मिळाले होते -- सुधीर दामले यांच्या स्मृतीस अभिवादन !

पुण्यात फक्त गुरू असतात -- शिष्य नसतात !

काफ्काची कादंबरी ' ट्रायल ', पिरांदेल्लो, बेकेट, आयनेस्को, सार्त्र यांची नाटके, पेसोआच्या कविता, तुकाराम व ज्ञानेश्वर --हे सर्व लेखन म्हणजे अमुक काळाला आलेल्या अमुक व्यक्तींच्या प्रतिक्रिया होत्या केवळ, असे दिसत नाही. ते सर्व काळ मूल्यात्मक राहिलेले दिसते. ते कशामुळे ? आणि प्रतिक्रिया हेच जर तत्त्व असेल तर प्रत्येक काळात प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिक्रिया वेगळ्या असतात. या अर्थाने अमुक एक काळ असेही काही अस्तित्वातच नसते, असे म्हणावे लागेल. एकूणात कलेचे क्षेत्र म्हणजे प्रतिक्रियांच्या गावगप्पांचा ( gossip ) आखाडा, असे म्हणावे लागेल. थोडक्यात, ' मूल्य ' हा शब्द कुचकामी असून ' संस्कृती ' हा शब्दही निरर्थक आहे, असेच म्हणावे लागेल. अनेक कलावंत, लेखक असे म्हणून गेलेले आहेत की कला ही प्रतिक्रियेच्या मर्यादा ओलांडणारी असते. तसे नसेल तर, सामाजिक-राजकीय परिवर्तनाचे प्रयत्न आणि करमणूक यांशिवाय कलेचे काम काय उरते मग ?

माझी शंका जरा वेगळ्या पद्धतीने मांडतो -- दलाल-मुळगावकर जेव्हा रोमँटिक चित्रे काढत होते तेव्हा जो संगीताचाही रोमँटिक बाज होता तोच आताही चालू आहे, असे दिसते. चित्रकला घाट आणि दृष्टिकोण यांत बदल शोधत गेलेली दिसते. तसे संगीत वा नृत्यात काही झाले का ?

आपला विषय अमूर्त चा चालला आहे, कृपया त्यावर बोला.

अमूर्त कविता असते -- ती कुठे दिसते ? म्हणजे सगळीच कविता अमूर्त ? अजब आहेत तुमचे विचार ! In a broader sense, abstract poetry is poetry that employs random images, stream-of-consciousness, and other abstract art techniques. दिसणे वा न दिसणे हा नसतो प्रश्न !

या कला प्रकारांतले प्रवाह समोर यावेत यासाठीच ही पोस्ट आहे -- त्यामुळे, धन्यवाद !

या निमित्ताने, जगण्याबाबत खूप खोलातले तुला काही समजत जाईल, कारण तू सामोरा जातो आहेस, ते तुझ्या लेखनातून येत राहीलच -- ते अमूल्य असेल ! शुभेच्छा ! ( प्रणव सखदेव – हेप-बी आजार )

आम्हालाही बी ए ला ' सन्स अँड लव्हर्स ' ही कादंबरी अभ्यासाला होती. तीत नायक पॉल हा एकदा रस्त्याने चालत असताना त्याला समोर पूर्ण चंद्र उगवलेला दिसतो आणि ते पाहून तो दचकून थांबतो -- अशा स्वरूपाचे एक वर्णन एका ठिकाणी असल्याचे आठवते. त्याचा कायमच प्रभाव राहिला !

मित्रा, कविता उत्तम आहे -- फक्त ' शहराची --- ' हे तिसरे कडवे अनावश्यक वाटतेय – ( राहुल बनसोडे )

सध्या वाचन-नियंत्रण चालू आहे. इलाज नाही.

या निमित्ताने --
मकबूल फिदा हुसेन..
मी एका ठिकाणी दिलेला -- मला जाणवलेला -- त्या सरस्वतीच्या चित्राचा अर्थ --
मुळात हे देवीचे, स्त्री म्हणून काढलेले उत्तान, नग्न चित्र आहे, ही कल्पनाच चुकीची आहे. स्त्रीदेहाचे आकर्षण वा मादकता व्यक्त करणारे असे कोणतेही अवयव तसे रेखाटलेले नाहीत. तो स्त्रीदेह आहे असे सांगण्यापुरतीच रूपरेखा

आहे. मुळात सरस्वती ही बुद्धी आणि सखोल ज्ञानाचे प्रतीक आहे. ते ज्ञान खुले, अनावृत आहे. सरस्वतीचा उजवा हात पाण्याबाहेर आल्याचे दाखवले आहे आणि त्या हातात कमळ आहे. हे ज्ञानाचे बाहेर आविष्कृत झालेले सौंदर्य आणि ताजेपण आहे. तो हात पाण्याबाहेर आलेला दाखवणे याचा अर्थच ती सरस्वती ज्ञानाच्या सखोल, वाहत्या प्रवाहात आहे. तिचे केस तिच्या डावीकडून उजवीकडे वाहते, लहरते दाखवलेले आहेत – तेही त्या प्रवाहाचे निदर्शक आहेत. ज्ञान हे स्थितिशील नसते – सतत वाहते, नवे, ताजे असते – हेच यातून सुचवलेले आहे. वरच्या बाजूला एक मासा दाखवलेला आहे. मासा जगतोच मुळी पाण्यातल्या प्राणवायूवर – तो ज्ञानाचा प्राणवायू आहे. माशाच्या त्या ज्ञानग्रहण प्रक्रियेचे निदर्शक असे बुडबुडे दाखवलेले आहेत. इथे वीणा तिच्या मांडीवर आहे. ती कला कौशल्य, नादसौंदर्य, संगीत यांचे प्रतीक आहे. त्या वीणेने सहजच योनीप्रदेश झाकला गेलेला आहे. ही लैंगिकतेला उत्तेजन न देणारी, उन्मादक नसलेली अशी कला आहे. मोर पिसारा फुलवून तिच्या मांडीवर नाचतो आहे. हे ज्ञानाचे फुलणे, आल्हादणे, व्यक्त होणे आहे. या सरस्वतीला व्यक्तिगत चेहरा नाहीय. ज्ञान व्यक्तिगततेच्या मर्यादा ओलांडणारे असते, हेच त्यातून सुचवलेले आहे. तिच्या कपाळावर आज्ञाचक्राच्या जागी कुंकवाचा टिळा आहे. बुद्धी आणि आध्यात्मिक ज्ञान यांचे ते केंद्र आहे. शिवाय ते स्त्रीच्या सौभाग्याचे लक्षण आहे. ती एक पत्नी आहे. पौराणिक संदर्भ धुंडाळून नक्कीच याचेही अधिक अर्थ लागतील. सरस्वती ही ब्रम्हाची पत्नी आहे. उत्पत्तीची, सर्जकतेची, निर्मितीची देवता आहे – हेही त्यातून व्यक्त होते. थोडक्यात, हे चित्र ज्ञानाची सर्जकता व्यक्त करते. मला यात आक्षेपार्ह तर काही वाटले नाहीच, उलट, या चित्रकाराने या देवतेचे सखोल प्रतिकात्मक अर्थ समजून घेऊन हे चित्र काढलेले आहे, असेच वाटले. यावर वाद झाले तेव्हा कुणी या चित्राचा हा अर्थ सांगितला होता की नाही, ते मला माहीत नाही. एकूणात, चुकीच्या पद्धतीने पाहून, चुकीचे अर्थ लावून, हुसेनांवर अन्याय झाला, असेच मला वाटते.
--- चं. प्र. देशपांडे.

जबरदस्त मूलगामी विश्लेषण ! कोलटकरांच्या कवितेसोबतच हेही अमर राहील ! ( सलील वाघ यांचा अरुण कोलटकरांवरचा लेख ).

माझा मित्र असे म्हणतो की बर्ट्रांड रसेल असे म्हणतो !

अत्यंत आत्मीयतेने आणि सखोलपणे ' चिंतन ' हे लाख्यांचे नाट्यचिंतन असलेले पुस्तक अभ्यासून लिहिलेला हा एक उत्तम अभिप्राय आहे. आनंद कुलकर्णी यांनी हे एक चांगले काम केलेले आहे. या पुस्तकावर मीही इथे लिहिले होतेच. सदर पुस्तक कोणतेही कलावंत आणि इतरही सर्वजण यांनी वाचावे असे आहे. हे नुसतेच कलेबाबत नसून जगण्याबाबतही आहे.

लेखकांवर अनेक ठिकाणी काही लिहिलेले असते त्यावरून अंदाज येऊ शकतो. नवीन लेखक असेल तर काही पानांतच अंदाज येतो. निवड अर्थात ज्याचीत्याची आवड आणि आच यांवरच ठरणार.

शेवटचा उतारा तर ' उतारा ' च ठरावा, असा आहे !

प्राची, महान काम चाललेय तुझे ! तुला आणि तुझ्या कामाला सादर शुभेच्छा ! ( प्राची माया गजानन )

राग ठीक पण हिंसा हा उपाय नाही –
२३-०८-२२.

स्वमताची वैचारिक कविता लिहिणाऱ्या कवीला ती कविता आधीच माहीत असते -- तीत अनपेक्षित काही नसते. स्वमताहून आधिक मोठा आवाका घेणाऱ्या कवितेत ही अनपेक्षितता असते. नुसतीच स्वमताची प्रतिक्रिया देणारी कविता खुजी असते.
एकरेषीय वैचारिक अर्थ -- या स्वरूपात ती कविता कधीच नाही ' समजणार ' . तो जगण्याच्या रचनेचा, प्रक्रियेचा तिच्या आंतर संबंधांसह आवाका वा भान असल्याने विचाराने वा मर्यादित निश्चितीने ' आता कळले ' असे कधीच होऊ शकणार नाही. कविता म्हणजे दगडासारखी ' निश्चित ' वस्तू नव्हे.
Champra Deshpande
वैचारिक निश्चितीने जे सांगून संपत नाही ती भुताटकी ?
' परि त्या विश्वंभरे बोलविले ' -- हे तुकाराम खोटे बोलत होता, असे तुमचे म्हणणे दिसते !

' हल्ली ' चे तरुण हा काही एक वेगळाच तुकडा आकाशातून पडलेला नाही. व्यक्तिमन असो की समाजमन ते सातत्याचे भोक्ते असते. सातत्य सोडायला घाबरणारे असते. तर हे जे ' वेगळे ' वाटते ते त्या सातत्यातूनच आलेले आहे. या मूळ समस्येकडे दुर्लक्ष करण्यासाठी इतर अनेक चर्चा उपयोगी पडतात !

जेवढा अहंकार घट्ट तेवढा कलाकृतीचा आवाका कमी. जो कलावंत स्वत:च्या प्रतिक्रिया, सुखदु:खे आणि मते यांनी बद्ध असतो तो खुजा असतो. परदेश, स्वदेश यांचा संबंध नाही. या अर्थाने स्वतंत्र कलाकृती या कालजयी वा जागतिक म्हणता येतील. काफ्का, सार्त्र, पिरांदेल्लो, बेकेट, आयनेस्को -- हे अहंकारातून नाही निर्माण होत. अस्तित्ववाद तिकडचा, अद्वैतवाद इकडचा वगैरे पद्धत अहंकाराला बढावा देणारी आणि स्वातंत्र्य नाकारणारी आहे.

स्व. अप्पासाहेब देशपांडे हे माझे चुलत काका होते.

पुण्यातल्या किर्लोस्कर प्रेसमध्ये, माझ्या पहिल्या नोकरीसाठीचे शिफारसपत्र आमच्या या वैद्य सरांचे होते ! कॉलेजात असताना, मर्ढेकरांचे ' सौन्दर्य आणि साहित्य ' हे सरांबरोबर आम्ही तीनचार विद्यार्थ्यांनी समजून घेतले !

मूल्यमापन म्हणा वा गुणप्रदान म्हणा, कशावर आधारित करावे याबाबतही तुमचे विचार मांडले जावेत. बोलणेच खुंटवणे हा मार्ग नाही.
तशी भयंकर भावना असणारे द्या सोडून -- आजचे म्हणून कुणी असतीलच ना -- त्यांच्याकडून कुठे येताहेत काही विचार ? काय असावेत निकष ? समजा आपण सगळेच सामान्य, नासमझ आहोत तर या समजुतीवर आधारित काम कसे करावे ?
या विषयावर इथे बरीच घुसळण झालेली आहे. आता जो तो घेईल समजून. आणि जेव्हा कुणाचेच समजणे हे फायनल नाही ठरू शकत तेव्हा काय घडायला हवे यावरही मतमतांतरे असणार. ही एक प्रक्रिया आहे. चालत राहील.

उघडीप नव्हती स्वप्नास येथे वास्तवाची जराही -- ये है मास्टर टच ! ( स्वप्नील चव्हाण ची कविता ).

( १ ) कवितेची स्वायत्तता अशी शब्दयोजना इथे अनेकदा येते. काय स्वायत्तता म्हणजे ? भाषेत जर सगळे आधीच उपलब्ध आहे तर स्वतंत्र, परिणामस्वरूप नसलेले, स्वायत्त म्हणजे काय ?

( २ ) निरनिराळ्या प्रकारच्या कवितांचे उल्लेख आहेत. उपयोगी वा निरुपयोगी हे कशावर ठरणार ? जी कविता escape म्हणजे पळवाट उपलब्ध करून देते ती उपयोगी, किंवा सामाजिक-राजकीय परिवर्तन करू पाहते ती उपयोगी, असे समजावे का ?
( ३ ) कवितेतली सर्जकता म्हणजे काय ? सामाजिक वास्तव आणि अपेक्षा तसेच परंपरा आणि अनेक प्रभाव आणि कवीची जनुके या मर्यादेतच सर्जकता असते का ? सर्जकता ही प्रतिक्रिया असते का ?
( ४ ) भांडवली व्यवस्थेने सर्व काही बद्ध आणि निर्धारित असेल तर कवितेत ‘ नवे ‘ काय घडू शकते ?
( ५ ) मुळात अमुक एक कृती कविता आहे का, हे आधी ठरवायला हवे, असे म्हटले आहे. याबाबतीत असंख्य मते आहेत तर ते आधी कोण ठरवणार ? असे ठरवणे आणि दर्जा ठरवणे यांत फरक काय ?
( ६ ) कवितेचे अस्तित्व-समर्थन काय असते ?
( ७ ) कवितासंग्रहांचे खपणे हे बाजार निर्धारित करतो. इथे बाजार म्हणजे वाचकांच्या आवडी आणि गरजा. ते लक्षात घेऊन बरेच कवी कविता लिहीत नाहीत. म्हणजे त्यांना बाजार नाही. हे त्यांचे कवितेचा उत्पादक म्हणून अपयश समजावे का ? की कवी म्हणूनही अपयश समजावे ? ( राहुल पुंगलियांच्या पोस्टवरची कॉमेंट ).

हिंदू चालतील पण हिंदुत्ववादी नाही चालणार ना !
मी हिंदुत्ववादी ? धन्य आहात !
मी कुणाच्या विरुद्ध वा बाजूने लिहीत नसतो -- आपणच निर्माण करत असलेल्या विसंगती आणि मृषा ( अबसर्ड ) परिस्थिती यांवर लिहितो -- तुमच्या अपेक्षेप्रमाणे लिहायला मी बांधील नाही -- तुम्हाला हे चालणार नसेल तर कृपया स्वत:हून रामराम करावा, ही विनंती. आपण दुतर्फी त्रास टाळावा, हे बरे !लोकशाही मान्यच आहे पण त्रागा वा शिक्के मारणे मान्य नाही. मी स्वत: कुणावर असे शिक्के मारत नाही, हे तरी तुम्ही पाहिले असेलच.माझी दोनतीन मते आहेत -- मतदानाच्या वेळी त्यांतले एक निवडेन --असो -- तुमची मते असू द्यात -- माझ्या लेखनात तुम्हाला न पटणारे बरेच असावे -- निरोप घेऊ या -- तुम्हाला ब्लॉक करत आहे –

वंचित-ग्रामीण कवितेची समीक्षा वेगळी आणि ' इतर ' कवितेची समीक्षा वेगळी -- असे काही असते का ? सर्व कवितांची समावेशक समीक्षा असू शकते, हे मान्य झाले तर दर्जाविषयक प्रश्नांबाबत जरा स्पष्टता येऊ शकेल.

त्या कविताच असतात -- निबंध नसतात -- याचबरोबर गद्य कविता हाही एक प्रकार आहे –

आशय हा प्रक्रियेसोबत असतो -- तो असतो किंवा नसतो -- असला तर वर्तमानातच असतो -- ' तात्पुरते ' असणे वगैरे निरर्थक असते -- मग तुम्ही म्हणाल, हे कुणी वाचणारही नाही -- हे असले प्रश्न कुणीच नाही सोडवू शकत –

हे बिनविरोध वर लिहिलेले नसून त्यातल्या निर्बुद्ध गुंत्यावर लिहिलेले आहे !
१७-१०-२२.

घटनात्मकतेला महत्त्व न देणाऱ्या काही कविता असतात -- त्या सूक्ष्मतेकडे जातात -- पण अशा कवितांची शक्यताच फेटाळणारे विचारवंत वाचक असतात -- त्यांचा प्रश्नच येत नाही –

माणसाला मत असावे की नसावे, यावर काय तुमचे मत ?
आले लक्षात -- तुम्ही मतविरोधी मताचे आहात !
25-10-22.

प्राची, फारच छान ! तुझ्या चिंतनातला सखोलपणा तुझ्या आवाजातून थेट पोचतोय !

मला ते सगळे माहीत आहे मित्रा ! ' गंमत ' हा शब्द वापरलेला असूनही कशाला हे ज्ञान वत्सा ? ☺असे गृहीत धरू नये रे -- दुसऱ्याने वाचताना मी ऐकले होते ! मी तुझा हा आदर नाही स्वीकारू शकत, सॉरी !
कवितेतला मी आणि स्वत: कवी एकच या समजुतीची गरज काय ?
प्रकट व प्रगट -- दोन्ही बरोबर, हे कृपया लक्षात घ्यावे. ' मराठी लेखन मार्गदर्शिका ' -- यास्मिन शेख -- या पुस्तकातही प्रकट व प्रगट दोन्ही एकच असे दिलेले आहे. हे पुस्तक आणि शब्द रत्नाकर हे मी विश्वासार्ह मानतो. तर्क म्हणाल तर माझा असा आहे की एक अक्षर बदलून वेगळ्या अर्थाचे शब्द -- यावर माझा विश्वास नाही. बोलण्याच्या वा वापराच्या ओघात एखादे अक्षर बादलले गेलेले असते आणि ते दोन्ही ग्राह्य धरले जाते, इतकेच. जसे सोयीस्कर व सोईस्कर दोन्ही ग्राह्य असते. दृषीकोण / न वा सामग्री/ सामुग्री -- किंवा साळुंकी / खी असे दोन्ही ग्राह्य असतात. असो. प्रगट, प्रगटणे -- याबद्दल -- प्रकट, प्रकटणे पहा -- मराठी शब्द रत्नाकर -- कै. वासुदेव गोविंद आपटे.

Champra Deshpande
" निरुपयोगी कविता म्हणजे ती कविता जी वास्तवाचा निर्देश करणे म्हणजेच सामाजिक व नैतिक भाष्य करणे,निसर्गाप्रति आस्था व्यक्त करणे,व्यक्तिगत भावभावनांना अभिव्यक्त करणे इत्यादी गोष्टी टाळते.ही अशी आत वळलेली म्हणजे कवितेच्या कृत्रिमतेचे रचलेपणाचे भान असलेली कविता आधुनिकतेच्या काळात,मागील दोन शतकात,जगभर उदयास आली. तर आधुनिकतेच्या काळात या कवितेचे सिद्धांतन देखील झाले.त्यामुळे कवितेतील प्रयोगशील अग्रणी प्रवाह हा स्वायत्त कवितेचा राहिला.
मराठी साहित्यात हा प्रवाह अधेमध्ये जरी डोकावला तरी बहुतांशी कविता ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या,अस्मितेच्या आणि समतेच्या लढ्यांमधून निर्माण झालेली होती व आहे. शिवाय संत काव्याच्या प्रबळ परंपरेनुसार जीवनाचे सार सांगणारी, उपदेश देणारी,संसाराचा अर्थ समजून सांगणारी एक प्रवृत्ती मराठी कवितेमध्ये कायमच होती " -- हे खूप महत्त्वाचे आहे. या बाबतीत एक लक्षात घ्यावे लागेल की कोणताही कवी सतत असिधारेवर नसतो -- काही कविता बोधप्रद असूही शकतात, पण, बऱ्याच ' निरुपयोगीही ' असू शकतात. कवी ऐवजी कवितेकडेच पाहिले जायला हवे. स्वायत्त कवितेला फारसे महत्त्व असणार नाही -- याचे कारण घिस्यापिट्यातच रमणे आणि आव्हाने न घेणे, या मनाच्या प्रवृत्तीत आहे. कवींनी लिहिताना या ' पाया ' ला मान द्यायचे कारण नाही. कवितेचा मर्डर करू इच्छिणारा फोर्स मराठीत खूप मोठा असला तरी स्वायत्त कविता लिहिली जाणे महत्त्वाचेच असेल. स्वायत्त म्हणजे ' कलावादी ' नव्हे -- उलट जगण्यातल्या मूलभूत आणि समावेशक प्रश्नांना भिडणारी कविता. अशी कविता ही एखाद्या गटाचे इंटरेस्ट सांभाळण्यासाठी नसते. तोच माणसाच्या जगण्यातला सांस्कृतिक प्रवाह असतो. त्यामुळे, पुंगलियांच्या या पोस्टमधले सर्वच विवेचन महत्त्वाचे आहे.
--- ० ---
बरेच असेही येतात वाचनात की कविता काही दिवस त्यांच्यांतून ' मला व्यक्त कर ' म्हणून टाहो फोडत असते !

मला जरा एक वेगळा मुद्दा दिसतो आहे -- त्याच्या सत्यतेबद्दल खात्री नाही. इतर कलांमध्ये घड्याळाचा काळ आणि मानसिक काळ या दोन्हींचे नियोजन कलावंताच्या हातात असते. चित्र आणि शिल्प हा फक्त मानसिक काळ असतो. तिथे क्रमाचे नियोजन नसते. मी असे वाचले होते की इंग्लंडमधली एक अभिनेत्री ए बी सी पासून झेड पर्यंत असे म्हणत जायची की लोकांच्या डोळ्यांत पाणी येई !

त्याने ( प्रसाद वनारसे ) आणि अतुल कुलकर्णींने चालवलेल्या रंगवर्धन या उपक्रमामुळे अनेक प्रायोगिक नाटकांचे महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी प्रयोग होऊ शकले ! त्यांत माझे ' बुद्धिबळ आणि झब्बू ' हेही होते ! प्रिय मित्र प्रसादचे मन:पूर्वक अभिनंदन !

महाग्रेट कविता पण मराठीत ही तातडीने नष्ट केली जाईल ! ( श्रीधर तिळवे ).

' मराठीतले कला-साहित्याचे क्षेत्र ( इथल्या ) मातीत घालायला जबाबदार कोण ' या विषयावर एखाद्या हौशी अभ्यासकाने इथली मराठीतली एक शेवटची डॉक्टरेट करावी, असे मी सुचवू शकतो. पण या विषयाला गाईड मिळेल का हाच एक प्रश्न आहे !

जगण्याचे चोंबाळे आणि भाषेची समृद्धी यांचा उत्तुंग मेळ ! ( श्रीधर तिळवे ).

जगातल्या प्रत्येक गोष्टीचा इतर सगळ्या गोष्टींवर परिणाम होत असतो !

हे चित्र पुन्हा पाहताना दिसलेले काही वेगळे -- रेल्वेच्या जनरल डब्यातल्या बाकावर आणि खाली दाटीवाटीने बसलेली ही माणसे आहेत. डाव्या हाताला वर मोकळा भाग आहे तो म्हणजे खिडकी आहे ! -- असेही खास वाटते हे चित्र ! Sharad Tarde

एक म्हणजे मी समीक्षकही नाही आणि सर्वज्ञही नाही. कविता या विषयावर मला आस्थेने काही मांडायचे आहे, तेवढ्यापुरते हे माझे पुस्तक असणार आहे. माझ्या यादीतले सर्व कवी माझ्या आवडीचे आहेत, असे नाही. त्यांच्या काही कविता ज्या मला चांगल्या वाटतात त्या घेतल्या आहेत. पूर्ण मराठी कवितेचा परिसर धुंडाळून लिहिण्याची जबाबदारी मी घेतलेली नाही. माझ्या यादीव्यतिरिक्तही अनेक चांगले कवी व कविता असू शकतील. ते सगळे मला माहीत नाहीत, मी वाचलेलेही नसतील. मी स्वत: मला एक लेखक समजतो, त्यामुळे, या कामाला मी किती वेळ द्यावा याला मर्यादा आहे. लोक समजून घेतील, असे वाटते.

तुमची भाषा या पोस्टमधल्या मानसिकतेचे फारच ठळक उदाहरण आहे ! तुम्हाला ब्लॉक करत आहे –

आशययुक्त भाषेच्या जलाशयात बिनधास्त पोहणे ! ( श्रीधर तिळवे ).

ते विचार शिरोधार्य मानणाऱ्या जनसामान्यांचेही विचार ! होय ! -- असा हा एक अत्युच्च दर्जाचा प्रांत आहे !

आणि प्रत्यक्षात इथले जगणे कसे चालू आहे -- हा उपरोधाचा सूर -- हीच आहे खरे तर ही पोस्ट -- काहीजण ती मुखमूल्यावरच पाहाताहेत –
१९-१२-२२.

या पुस्तकाला मिळणारा प्रतिसाद आनंददायक आहे ! ( नाटक: एक मुक्त चिंतन ).
31-12-2022.